**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**

**(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)**

# कोटांतर्गत प्रवेशाचे वेळापत्रक

**प्रवेश फेरी - २** **(कोटांतर्गत जागा प्रवेशासाठी)** https://11thadmission.org.in

| क्र | दिनांक व वेळ | कोटा प्रवेश कार्यवाही | |
|---|---|---|---|
| | | कोटानिहाय उपलब्ध रिक्त जागा | |
| १ | दि.२७-०६-२०२३, स.१०:००वा पासून दि.२९-०६-२०२३, रात्री.१०:००वा पर्यंत | • कोटांतर्गत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन पसंती नोंदविणेची सुविधा (Apply for quota) (व्यवस्थापन कोटा, इनहाऊस कोटा आणि अल्पसंख्याक कोटा) (जे विद्यार्थी कोणत्याही कोट्यातून प्रवेश घेऊ इच्छितात, त्यांनी विद्यार्थी लॉगिनमध्ये कोट्यासाठी ऑनलाईन Apply करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना लॉगीनमध्ये संबंधित विद्यालयामध्ये कोट्यातून प्रवेशासाठी आपली पसंती नोदविता येईल)<br>• कनिष्ठ महाविद्यालयांना व्यवस्थापन आणि इन-हाऊस कोट्यांतील रिक्त जागा CAP कडे प्रत्यार्पित करता येतील.<br>---<br>• कोटा प्रवेशासाठी पसंती विद्यार्थ्यांना (वेळापत्रकानुसार) बदलता येईल अन्यथा मागील फेरीची पसंती कायम राहील.<br>• विद्यार्थ्यांनी त्यांनी भरलेल्या भाग-१ आणि भाग-२ अर्जांची प्रिंट काढून सोबत ठेवावी. | अर्ज भरणे |
| | | | |
| २ | दि.३०-०६-२०२३ ते दि.०२-०७-२०२३ | • विद्यालयांनी कोटा पसंती दिलेल्या विद्यार्थ्यांची कोटावार गुणवत्ता यादी नियमानुसार तयार करणे. | |
| ३ | दि.०३-०७-२०२३, स. १०:००वा. | • प्रवेशासाठी पात्र/ निवडलेले आणि प्रतीक्षेतील विद्यार्थ्यांची यादी विद्यालय स्तरावर प्रदर्शित करणे.<br>• निवडलेल्या विद्यार्थ्यांना कोटांतर्गत प्रवेशासाठी फोन करणे, संदेश देणे. (विद्यालय स्तरावरील कार्यवाही) | |
| | | | |
| ४ | दि.०३-०७-२०२३, स.१०:००वा पासून दि.०५-०७-२०२३, सायं.०६:००वा पर्यंत | • या कालावधीत (व्यवस्थापन, इनहाऊस आणि अल्पसंख्याक) कोटांतर्ग प्रवेश निश्चित केले जातील. कोट्यातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीनुसार आपला प्रवेश निश्चित करणे.<br>• पात्र व पसंती दिलेल्या विद्यार्थ्यांच्या कोटानिहाय याद्या विद्यालयात प्रदर्शित केल्या जातील. कनिष्ठ महाविद्यालये त्या विद्यार्थ्यांपैकी पात्र विद्यार्थ्यांना व त्यांचे संमतीने संबंधित कोट्यातून गुणवत्तेनुसार प्रवेश देऊ शकतात.<br>---<br>अल्पसंख्याक कोटा प्रवेश टीप-<br>समान अल्पसंख्याक प्रकारातील (भाषिक - भाषिक किंवा धार्मिक - धार्मिक) अंतर्गत प्रवेश करण्याची सुविधा उपलब्ध होईल. | प्रत्यक्ष प्रवेश फेरी |
| ५ | दि.०५-०७-२०२३, रात्री.०८:०० वा पर्यंत | प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती पोर्टलवर ऑनलाईन नोंदविणेसाठी उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी वेळ.<br>उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोट्यातील जागा समर्पित करण्यासाठी वेळ. (व्यवस्थापन कोटा आणि इनहाऊस कोटा) | |
| | | कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर कोटानिहाय रिक्त जागा प्रदर्शित करणे. (या प्रवेश फेरीच्या समाप्तीनंतरची स्थिती) | |

सूचना-

३. केंद्रीकृत प्रवेश प्रक्रिया आणि कोटा प्रवेश वेळापत्रकानुसार एकाच वेळी आयोजित केले जातील.

४. अल्पसंख्याक कोट्याच्या रिक्त जागा समर्पण करण्याची सुविधा नियमित फेरी-३ नंतर दिली जाईल.

५. द्विलक्षी विषयांसाठी प्रवेश कार्यवाही व्यवसाय शिक्षण विभागाचे मान्यतेने सुरु करता येतील. (केवळ प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी)

पुणे,

दिनांक-२६/०६/२०२३

शिक्षण सहसंचालक 26/6

(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**

**(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)**

# CAP प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

नियमित फेरी - 2 (केंद्रीय प्रवेशाच्या CAP जागांसाठी) https://11thadmission.org.in

| क्र | दिनांक व वेळ | केंद्रीय प्रवेश कार्यवाहीचा तपशील | |
|---|---|---|---|
| | | VACANCY | |
| १ | दि.२७-०६-२०२३,<br>स.१०:००वा पासून<br>दि.२९-०६-२०२३,<br>रात्री.१०:००वा पर्यंत | १. प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे, म्हणजे नियमित फेरी-२ साठी पसंती अर्ज भाग-२ ऑनलाईन सादर करणे.<br>विद्यार्थ्यांना भाग-२ मध्ये किमान एक व कमाल १० पसंतीक्रम / विद्यालये नोदविता येतील.<br>२. नवीन विद्यार्थी ऑनलाईन नोंदणी करुन अर्ज भाग-१ भरून तो प्रमाणित करुन घेऊ शकतात.<br>३. विद्यार्थ्यांना त्यांचा अर्ज भाग-१ मध्ये दुरुस्ती करता येईल, फक्त अर्ज वेळेत लॉक करणे अनिवार्य राहील.<br>टीप१- केवळ भाग-१ पडताळणी झालेले विद्यार्थी भाग-२ भरू शकतात.<br>टीप२-फक्त पसंतीक्रम भाग-२ लॉक असलेले अर्ज अलॉटमेंटसाठी विचारात घेतले जातील.<br>---<br>• सदर प्रवेश फेरीमध्ये विद्यार्थ्यांना पसंतीक्रम बदलता येतील अन्यथा मागील फेरीचे पसंतीक्रम कायम राहतील.<br>(१.प्रवेश घेतलेले, २.फेरी-१ मध्ये प्रथम पसंतीक्रम मिळालेले (प्रवेश न घेतलेले तसेच रद्द केलेले) अर्ज या फेरीसाठी प्रतिबंधित आहेत)<br>---<br>• यासोबत इच्छुक विद्यार्थी, कोटा प्रवेशासाठी ऑनलाईन पसंती नोंदवू शकतात. (Apply for Quota)<br>• प्रवेशित विद्यार्थी, द्विलक्षी विषय प्रवेशासाठी ऑनलाईन पसंती नोंदवू शकतात. (Apply for Bifocal)<br>(कोटा तसेच द्विलक्षी प्रवेशासाठीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे संलग्न आहे) | अर्ज सादर करणे |
| | | | |
| ४ | दि.३०-०६-२०२३ ते<br>दि.०२-०७-२०२३ | DATA PROCESSING (back-end activities)<br>पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करणे तसेच विभागीय CAP समित्यांकडून Allotment चे पूर्व परीक्षण. | |
| ५ | दि.०३-०७-२०२३,<br>स. १०:००वा. | १. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालय निवड यादी / तपशील पोर्टलवर प्रदर्शित करणे.<br>२. विद्यार्थी लॉगीन मध्ये त्याला प्रवेशासाठी मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय दर्शविणे.<br>३. संबंधित विद्यालयास प्रवेशासाठी मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी कॉलेज लॉगीन मध्ये दर्शविणे.<br>४. फेरीचे कट-ऑफ पोर्टलवर दर्शविणे. (विद्यार्थ्यांना संक्षिप्त संदेश/SMS देणे) | |
| | | | |
| ६ | दि.०३-०७-२०२३,<br>स.१०:००वा पासून<br>दि.०५-०७-२०२३,<br>सायं.०६:००वा पर्यंत | ५. कॉलेज लॉगीन मध्ये प्रवेश ऑनलाईन निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे तसेच प्रवेश नाकारणे या प्रक्रिया सुरु राहतील.<br>६. अलॉट झालेल्या उमावि/कमवि मध्ये आपला प्रवेश निश्चित करणे, (प्रवेशास जाण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे).<br>७. अलॉट झालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास, प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करुन आपला प्रवेश तेथे निश्चित करावा (वेळापत्रकाप्रमाणे दिलेल्या वेळेत)<br>८. जर अलॉट झालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यायचा नसेल तर असे विद्यार्थी पुढील फेरीची वाट पाहू शकतील (खालील टीपा वाचा).<br>---<br>टीपा : -<br>• जर विद्यार्थ्याला मिळालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल तर विद्यार्थी लॉगिनमध्ये (Proceed for Admission) क्लिक करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत आणि अलॉट झालेल्या विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा.<br>• जर एखाद्या विद्यार्थ्याला अलॉट झालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यायचा नसेल तर तो पुढील फेऱ्यांसाठी थांबू शकतो. परंतु, ज्या विद्यार्थ्यांना प्रथम पसंतीचे विद्यालय अलॉट झालेले आहे, त्यांनी तेथेच प्रवेश घेणे अनिवार्य आहे. जर प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही किंवा प्रवेश नाकारला गेला, तर त्यांना पुढील एका नियमित फेरीसाठी प्रतिबंधित केले जाईल आणि त्या फेरीनंतरच प्रवेशासाठी त्यांचा विचार केला जाईल.<br>• जर एखाद्या विद्यार्थ्याला त्याचा/तिचा निश्चित केलेला प्रवेश रद्द करायचा असेल, तर त्यासाठी संबंधित विद्यालयास विनंती करून आपला प्रवेश रद्द करून घेता येईल. असे प्रवेश रद्द केलेले विद्यार्थीही पुढील एका नियमित फेरीसाठी प्रतिबंधित होतील.<br>---<br>• पुढील फेरीसाठी नवीन विद्यार्थी नोंदणी आणि अर्ज भाग-१ भरणे सुरू राहील.<br>(या कालावधीत फॉर्म भाग-१ मध्ये अनलॉक / दुरुस्ती करता येणार नाही)<br>• कोटांतर्गत प्रवेश तसेच द्विलक्षी विषयांसाठीचे प्रवेशाबाबत स्वतंत्र वेळापत्रकात दर्शविल्याप्रमाणे कर्यवाही करता येईल. | प्रवेश निश्चित करणे |
| ७ | दि.०५-०७-२०२३,<br>रात्री.०८:०० वा पर्यंत | प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती पोर्टलवर ऑनलाईन नोंदविणेसाठी उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी वेळ. (रात्री ०८:०० वा. पर्यंत)<br>उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोट्यातील रिक्त जागा CAP कडे प्रत्यार्पित करण्यासाठी वेळ. (व्यवस्थापन आणि इनहाऊस कोटा) | |
| | | प्रढील फेरी साठी रिक्त जागा जाहीर करणे. (CAP व कोटांतर्गत रिक्त जागांचा समावेश असेल.) | |

सूचना-

१. प्रत्येक घटकाने कोणत्याही क्रियाकलापासाठी दिलेल्या वेळेची मर्यादा (वेळापत्रकानुसार) पाळली पाहिजे.

२. पुढील प्रवेश प्रक्रियेचे तपशीलवार वेळापत्रक त्यानंतर घोषित केले जाईल.

पुणे,
दिनांक-२६/०६/२०२३

26/6/23
शिक्षण सहसंचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)